# -:: प्रकरण - १ रे ::-

## संशोधन पद्दती

# प्र क र ण ३ रे

## संशोधन पद्धती

३·१ प्रास्ताविक

३·२ अभ्यासविषयाचे नाव

३·३ अभ्यासविषय निवडणेची कारणे

३·४ उद्दिष्टे

३·५ नमुना निवड

३·६ साधनांची निवड

३·७ स्थान निश्चीती

# प्रकरण - ३ रे

## संशोधन पध्दती

### ३·१ प्रास्ताविक :

या संशोधनामधुन संशोधकाने कराड तालुक्यातील ऊसतोडी कामगारांची समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून माहिती मिळवून तिचे संकलन केले आहे· देशातील सर्वच साखर तसेच गुळ उद्योगातील ऊसतोडणी कामगारांची सामाजीक दृष्टी, दैनंदिन जीवन, कौटुंबिक आर्थिक स्थिती, त्यांच्या समस्या इ· बाबतीत साम्य आढळते·

ऊस तोडणी व वाहतूक करणारे कामगार हे साखर उत्पादनाशी संबंधात कारखान्याचे कामगार आहेत· व त्यांना कारखान्यातील कामगारांप्रमाणे वेतन मिळेल या रीतीने त्यांचे दर ठरविले जावेत हे तत्व उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयातून प्रस्थापित झाले असताना त्याची अद्यापही अंमलबजावणी झालेली नाही· एवढेच नव्हे तर कामगारांना साधे शेतमजुरांचे किमान वेतन सुध्दा मिळत नाही·

ऊस तोडणी कामगारांच्यासाठी दोन्हीही वेतन मंडळानी ( साखर कामगार वेतन मंडळ ) कांहीही ठोस तरतुदी सुचविलेल्या नाहीत· आज ऊसतोडणी कामगार अगदी गुलामगिरीचे, वेठबिगारीचे जीवन जगत आहेत· ऊसतोडणी कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक सुविधा नाहीत· उदा·दवाखाना, पिण्याच्या पाण्याची सोय, दिवाबत्तीची सोय नाही· ऊसतोडणी कामगार व गाडीवान यांना खोप्यासाठी चटया

व बांबू पुरविले जातात. आज ऊसतोडणी कामगार भटक्या गुलामीचे, वेठबिगारीचे जीवन जगत आहे. त्यांचेही अनेक महत्वाचे प्रश्न तसेच पडून आहेत. त्यांची मुले शिक्षणापासून वंचीत राहिली आहेत. त्यांच्याही नशिबात हेच जिणे येणार आहे.[१]

ऊसतोडणी कामगार इतक्या दूर अंतरावर येवून त्यांच्या पदरी काय पडते ? तर फक्त त्यांचा उदर निर्वाह भागू शकतो. त्यांच्या मूळ गावापासून सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी ऊस तोडणी कामगार बाहेर पडलेला असतो. वर्षातील जवळ-जवळ निम्म्या कालावधीमध्ये ते एका वेगळ्याच अशा समाजामध्ये वावरत असतात. येथील सामाजिक व भौगोलिक वातावरण त्यांच्या मुळ गांवातील वातावरणापेक्षा भिन्न असते. मुळ गावातील तर नमुद केलेल्या सार्वजनिक सुविधा व कामाच्या ठिकाणच्या म्हणजेच कराड तालुक्यातील सामाजिक सुविधा यात फरक असतो. त्याचा त्यांना लाभ होतोच असे नाही. महाराष्ट्रापुरता विचार केला तर जवळ-जवळ ४ लाखाच्या आसपास ऊसतोडणी कामगारांची संख्या आहे. या कामगारांच्या सामाजिक जीवनाचा एक प्रातिनिधीक अभ्यास म्हणून " कराड तालुक्यातील ऊसतोडणी कामगार " हा येथे अभ्यास विषय म्हणून सांगता येईल. अभ्यास विषयाची व्याप्ती व संशोधन पध्दती पुढीलप्रमाणे

### ३.२ अभ्यास विषयाचे नाव :

" कऱ्हाड तालुक्यात येणाऱ्या ऊसतोडणी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास " ("A Sociological Study of Sugarcane Cutters from Karad Taluka.")

३·३ अभ्यास विषय निवडण्याची कारणे :

हा विषयनिवडताना पुढील कारणे विचारात घेतली होती·

(१) साखर उद्योगातील जो वर्ग सतत आर्थिक दडपणाखाली दबला गेला आहे व जो भविष्यातही आर्थिक कोंडी फोडण्याची शक्यता नाही, अशा वर्गाची सामाजिक स्थिती अभ्यासून त्यांच्या वास्तवाची जाणीव समाजाला होणे आवश्यक आहे·

(२) त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती कराड तालुक्यातील ग्रामीण भागात काम करणा-या भूमीहीन शेतमजूरापेक्षाही वाईट आहे· कामगार भरतीची कंत्राटी पध्दती साखर उद्योगातील ऊसतोडणी कामगारासाठी वापरली जाते· या कंत्राटी पध्दतीने करावयाच्या कामगार भरतीवर शासनाचे कसलेही नियंत्रण आढळून येत नाही·

(३) ऊसतोडणी कामगार दारिद्र्याच्या व पिळवणूकीच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडू शकेल काय ? तसेच त्याची गुलामगीरी सारखी असणारी अवस्था केंव्हा संपेल ? ऊसतोडणी कामगार आपल्या हक्कासाठी केंव्हा जागृत होईल ? त्यांच्या जागृतीस व संघटनात्मक वृतीत कोणते अडथळे आहेत ? यांचा अभ्यास या ठिकाणी करता येणार होता·

(४) ऊसतोडणी कामगार कामाच्या ठिकाणी आल्यानंतर आप-आपसातील सामाजिक संबंध, येथील समाजाशी येणारे त्याचे सामाजिक संबंध, धर्म रितीरिवाज, रुढी, दैनंदिन जीवनातील त्याचे वर्तन कसे असते इ·बाबींचा अभ्यास या अभ्यासविषयातून करता येणार होता·

(५) या प्रातिनिधिक अभ्यास विषयातून महाराष्ट्रात ४ लाखाच्या घरात असणा-या या कामगारवर्गाची प्रातिनिधिक स्वरुपाची माहिती

प्राप्त होणार होती. म्हणून हा अभ्यास विषय अभ्यासासाठी निवडला.

## ३.४ उद्दिष्टे :

१) ऊसतोडणी कामगाराच्या सर्वसामान्य आर्थिक जिवनावर प्रकाश टाकणे.

२)"प्रवासी वृत्ती" कामगारांच्या पिळवणुकीचे विश्लेषण करणे.

३) ऊसतोडणी कामगार कामाच्या ठिकाणी आपल्या धर्म व जातीविषयक कल्पना कशा प्रकारे वापरतो याचा अभ्यास करणे.

४) त्याची पिळवणूक करणा-या मुख्य घटकाविषयी त्याचे असणारे मत व या मताचा ऊसतोडणी कामगाराच्या शैक्षणिक दर्जाशी असणारा संबंध अभ्यासणे

५) ऊसतोडणी कामगार सतत कर्जात का रहातो ? कर्जाची कारणे कोणती ? त्याचे उत्पन्नाचे मार्ग कोणते ? याचा अभ्यास करणे.

६) ऊसतोडणी कामगाराला या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी कोणते उपाय योजणे शक्य आहे ? याचा विचार करणे.

## ३.५ नमुना निवड :


सदरचा अभ्यास मुख्यत्वे करुन नमुन्याच्या पासून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहिती संकलनावर आधारित आहे. कराड तालुक्यात ऊसतोडणी कामामध्ये काम करणा-या कामगारांची संख्या दोन हजाराच्या आसपास आहे. संशोधनाच्या अघाती नमुना पध्दतीशिवाय या कामगारांचा अभ्यास करणे अशक्य होते. कारण हे कामगार निश्चित अशा एकाच ठिकाणी काम

करताना आढळतील असे नाही. ऊस तोडणी कामगारांचा समाजशास्त्रीय अभ्यास करताना कोणताही भेद लक्षात न घेता १०० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या ही मुलाखत घेताना पुरुष व स्त्रिया असा भेद, कृष्णा सहकारी साखर कारखाना किंवा सहयाद्री सहकारी साखर कारखाना असा भेद, किंवा वयोगट, वैवाहिक दर्जा, जात, मातृभाषा इ. बाबतीतील भेद लक्षात न घेता नमुना निवडीच्या अपाती नमुना निवड पध्दतीने नमुना निवड केली.

३.६ साधनांची निवड :

संशोधकाने या अभ्यास विषयाच्या अभ्यासासाठी वेगवेगळ्या साधनांचा वापर केला. ऊसतोडणी कामगारांच्या सर्व सामाजिक अंगाना स्पर्श करेल अशा पध्दतीची प्रश्नावली तयार केली. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामगारांच्या तसेच स्वत:च्या सोयीनुसार प्रत्यक्ष स्वत:च भेटून प्रश्नावलीच्या सहाय्याने मुलाखती घेतल्या. या पध्दतीमुळे ऊसतोडणी कामगार व संशोधक यांच्यामध्ये प्रत्यक्ष संबंध आले. त्यामुळे उत्तरदात्यांच्या निश्चित प्रतिक्रिया संशोधकाला प्राप्त झाल्या. जर एखादा मुद्दा उत्तर दात्याला नीट आकलन होऊ शकला नाही तर संशोधकाने त्याला विश्लेषण करुन सांगून माहिती प्राप्त करुन घेतली. या प्रत्यक्ष संबंधामुळे ऊसतोडणी कामगारांच्या दैनंदिन जीवनाची संशोधकाला इतर सर्वसाधारण माहिती प्राप्त झाली.

प्रश्नावलींच्या सहाय्याने प्राप्त झालेल्या माहितीचे संकलन संशोधकाने मास्टर शीटमध्ये केले. मास्टर शीटच्या सहाय्याने सारण्या तयार केल्या. त्याचे विश्लेषण संशोधकाने प्रकरण ४ मध्ये केले आहे.


खंडाळा
फलटण
महाबळेश्वर
वाई
मेढा
(जावळी तालुका)
कोरेगाव
सातारा
दहिवडी
(माण तालुका)
वडूज
(खटाव तालुका)
पाटण
कराड
उ
सातारा जिल्हा
तालुके
० १५ ३०
किलोमीटर

३·७ स्थान निश्चीती :

उसतोडणी कामगारांचा अभ्यास करताना कराड तालुका हे क्षेत्र निवडण्यात आले· कराड तालुक्यात सहयाद्री सहकारी साखर कारखाना व कृष्णा सहकारी साखर कारखाना हे दोन कारखाने आहेत· त्यांचे कार्यक्षेत्र कराड तालुक्याच्या बाहेर तसेच सांगली जिल्हयाच्या कांही भागात आहे· परंतु संशोधकाने या सहकारी साखर कारखान्यासाठी उसतोडणी करणा-या फक्त कराड तालुक्याच्या क्षेत्रात असणा-याच कामगारांची निवड अभ्यासासाठी केली होती· कराड तालुक्यात उसतोडणीचे काम करणा-या स्थानिक कामगारांचे प्रमाण अगदीच नगण्य आहे·

-x-x-x-x-x-

सं द र्भ :

१· गोपाळ गुरु , आक्टोंबर,१९८९· महाराष्ट्रातील सहकारी साखर धंदा व साखर कामगार चळवळ - एक अभ्यास·

कोल्हापूर - गोपाळ गुरु, शिवाजी विद्यापीठ, पृष्ठ ४ व १०·

=0=0=0=0=0=